■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - ३१५ ■ शनिवार दि.२ ऑगस्ट २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रु. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 315 ■ Saturday Dt. 2 August 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# राजकारणातील एक निर्णायक आणि दूरदृष्टी असलेले धनंजय मुंडेंच्या शिफारशीमुळे मराठा शेतकऱ्याच्या मुलाला मिळाली मोठी संधी!

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# माजी मंत्री तथा आ.धनंजय मुंडेंच्या पुढाकारातून पत्रकार ते प्रवक्ते म्हणून भागवत तावरे यांची धवधवीत भरारी!

## बीड जिल्ह्याच्या विकासाचा शिल्पकार, ठाम निर्णय, स्पष्ट भूमिका असल्याने धनंजय मुंडेंचा प्रभाव

## पत्रकार भागवत तावरे यांची राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश प्रवक्तेपदी निवड

**बीड । प्रतिनिधी**

**महाराष्ट्राच्या राजकारणात ठाम निर्णय, स्पष्ट भूमिका आणि सामान्य जनतेच्या प्रश्नांवर थेट लक्ष केंद्रीत करणारा नेता म्हणून माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांची ओळख दिवसेंदिवस बळकट होत आहे. त्यांनी घेतलेले निर्णय हे विकासाभिमुख आणि जनहिताचे ठरत आहेत. धनंजय मुंडे यांच्या शिफारशीमुळे एक सर्वसामान्य मराठा शेतकऱ्याचा मुलगा आणि पत्रकार असलेल्या भागवत तावरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश प्रवक्ता म्हणून काम करण्याची मोठी संधी मिळाली आहे. राजकारण, सामाजिक प्रश्न आणि ग्रामीण भागातील समस्यांवर थेट भूमिका मांडणारे भागवत तावरे हे पत्रकारितेच्या माध्यमातून गेली अनेक वर्षे सक्रिय होते. पक्षाच्या विविध उपक्रमांत त्यांनी सातत्याने सहभाग घेतला. त्यांच्या स्पष्ट आणि तडफदार मते मांडण्याच्या शैलीला पक्षश्रेष्ठींनी मान्यता दिली असून, त्यांचा प्रदेश प्रवक्तेपदी समावेश करून त्यांच्यावर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.**

### कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना ग्रामीण तरुणाला दिलेली संधी : धनंजय मुंडेंचा लोकसहभागाचा आदर्श ठरतोय!

ग्रामीण भागातील एका सर्वसामान्य मराठा शेतकरी कुटुंबातून आलेल्या आणि कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या तरुणाला पक्षाच्या महत्त्वाच्या भूमिकेसाठी संधी देत धनंजय मुंडे यांनी पुन्हा एकदा लोकसहभागाचा आदर्श निर्माण केला आहे. पत्रकार भागवत तावरे यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रदेश प्रवक्तेपदी नुकतीच निवड करण्यात आली. बीड जिल्ह्यातील छोट्याशा गावातून आलेल्या तावरे यांचे शिक्षण आणि संपूर्ण वाटचाल ग्रामीण वातावरणात झाली. त्यांनी गेल्या अनेक वर्षांत पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक व ग्रामीण प्रश्नांवर ठाम भूमिका घेतली. त्यांच्या निष्ठा, कार्यकौशल्य आणि जनसंपर्कावर विश्वास ठेवून धनंजय मुंडे यांच्या पुढाकाराने त्यांना थेट प्रदेश प्रवक्त्याची जबाबदारी दिली आहे. धनंजय मुंडे यांच्याकडून मिळालेली ही संधी कोणत्याही पारंपरिक राजकीय वंशपरंपरेपासून दूर असलेल्या युवकांसाठी आशेचा किरण ठरत आहे. फक्त निष्ठा, मेहनत आणि जिद्द असेल, तर मोठ्या संधी मिळू शकतात याचे हे जिवंत उदाहरण आहे, अशी प्रतिक्रिया अनेक तरुणांनी दिली आहे. या निवडीमुळे ग्रामीण भागातील तरुणांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, सामान्य माणसालाही मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या जातात, हे पुन्हा सिद्ध झाले आहे.



धनंजय मुंडे यांनी ग्रामीण आणि मराठा समाजातील गुणवंतांना संधी देण्याची परंपरा कायम ठेवत तावरे यांच्यावर विश्वास दाखवला. त्यामुळे या निवडीमुळे संपूर्ण बीड जिल्ह्यात समाधान व्यक्त होत आहे. धनंजय मुंडेंची राजकीय कारकीर्द नेहमीच जनतेशी जोडलेली राहिली आहे. शेतकरी, बेरोजगार, महिलावर्ग आणि ग्रामीण युवक यांच्या प्रश्नांना आवाज देत त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. त्यांची शैली आक्रमक, पण विकासावर केंद्रित असते. जिल्ह्यातील पाणी प्रश्न असो की रोजगारनिर्मिती, त्यांनी प्रत्येक विषयाला आपले मानून त्यासाठी निधी मिळवून दिला आहे. धनंजय मुंडे यांनी नेहमीच प्रतिभेला संधी, कार्यकर्त्यांना मान या तत्वानुसार काम केले असून, भागवत तावरे यांची निवड त्याचाच प्रत्यय देणारी आहे. या निवडीमुळे बीड जिल्ह्याच्या राजकारणात नवचैतन्य निर्माण झाले असून, तळागाळातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. तावरे यांचे कार्य आणि अनुभव पक्षाच्या प्रचार व जनतेशी संवादासाठी निश्चितच मोलाचे ठरणार आहे, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. या निवडीत धनंजय मुंडेंचा मोलाचा वाटा असून, त्यांनी आपल्या राजकीय ताकदीचा वापर करून एका सामान्य घरातील युवकाला मोठ्या व्यासपीठावर नेऊन ठेवले आहे.

निवडीनंतर प्रतिक्रिया देताना भागवत तावरे म्हणाले, माझ्यावर विश्वास दाखवणाऱ्या धनंजय मुंडे साहेबांचे मी आभारी आहे. पक्षाच्या धोरणांचा प्रचार आणि जनतेच्या प्रश्नांवर आवाज बुलंद करण्यासाठी मी ही भूमिका प्रामाणिकपणे पार पाडणार आहे.

या निवडीनंतर बीड जिल्ह्यासह मराठवाडा परिसरातून तावरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, सामान्य घरातील व्यक्तीलाही मोठ्या स्तरावर काम करण्याची संधी मिळू शकते, याचे हे प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.



खांडे पारगाव येथे महाराष्ट्र आधार सेनेचे शाखा उद्घाटन थाटात संपन्न

# अठरा पगड जाती धर्माच्या जनसेवेसाठी कटिबद्ध : दीपक थोरात

**बीड । प्रतिनिधी**

ना जातीचा न धर्माचा एक हात मदतीचा उल्लेखनीय कार्य असलेल्या महाराष्ट्र आधार सेनेच्या नव्याने स्थापन करण्यात आलेल्या संघटनेचे नावलौकिक कार्य आहे. त्यांची आरोग्य सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये या अगोदरच वेगळी ओळख आहे. बीड जिल्ह्यामध्ये जेव्हा ग्रामीण भागातून माणूस येतो तेव्हा त्यांच्या मदतीसाठी धावून जाणारा माणूस कोणी असेल तर फक्त दिपक थोरात यांच्याकडे पाहिले जाते तर यावेळी आता महाराष्ट्र आधार सेनेची शाखा ही बीड तालुक्यातील दुसरी शाखा खांडे पारगाव या ठिकाणी स्थापन करण्यात आली.

महाराष्ट्र आधार सेनेच्या माध्यमातून गोरगरीब जनतेसाठी ना जातीचा धर्माचा आहे. एक हात मदतीचा हेच ब्रीदवाक्य घेऊन आज बीड जिल्ह्यामध्ये तरुण महाराष्ट्र आधार सेनेचा झेंडा हाती घेत आहे. यामध्ये काल खांडे पारगाव या ठिकाणी शाखा उद्घाटन झाली या शाखा उद्घाटनासाठी सर्व जाती धर्मातील तरुण माता भगिनी मित्र बंधू उपस्थित होते. या शाखा च्या माध्यमातून नक्कीच गोरगरिबांना बीड जिल्ह्यामध्ये आरोग्य क्षेत्र असेल किंवा पोलीस प्रशासन कुठली अडचण असेल तर त्यांना मदत मिळेल, असे प्रतिपादन माजी सरपंच अशोक जिजा आमटे यांनी केले यावेळी महाराष्ट्र आधार सेनेच्या दिपक थोरात याच्या हस्ते शाखेचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी सरपंच रामेश्वर आनेराव उपसरपंच अनिल आबा माजी उप सरपच अशोक जिजा आमटे आमटे युवा नेते राजेंद्र आमटे अशोक वाघमारे रवी वाघमारे, महाराष्ट्र आधार सेनेचे कार्याध्यक्ष युवा नेते अशोक आबा वाघमारे कपिल जोगदंड ज्येष्ठ नेते दत्ता सौंदरमल उपस्थित होते.

महाराष्ट्र आधार सेनेची खांडे पारगाव ची कार्यकारणी खालील प्रमाणे करण्यात आली. शाखा अध्यक्ष परशुराम वाघमारे, उपाध्यक्ष - अमोल वाघमारे, शाखा सचिव- महादेव वाघमारे, सदस्य राहुल वाघमारे, कृष्णा वाघमारे, संतोष वाघमारे, सुदाम वाघमारे, आयुष्य वाघमारे, जय वाघमारे, हनुमान वाघमारे, क्रिश वाघमारे सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे या ठिकाणी अभिनंदन व शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला. पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आले.

# परळी येथे जिल्हा वाहतुक शाखेची धडाकेबाज कारवाई

## नियमभंग करणाऱ्यांची धांदल; १२६ वाहनांवर केसेस करुन ८६ हजार २०० रुपयांचा ठोठावला दंड

**बीड । प्रतिनिधी**


बीड पोलीस अधिक्षक नवनीत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन यांनी गर्दीला शिस्त आणण्यासाठी पोलीस कारवाईचा धडाका सुरु केला असून याची प्रचिती गुरुवारी दिसून आली. वाढत्या वाहनांच्या गर्दीला नियमासह शिस्त आणण्यासाठी जिल्हा वाहतुक शाखेने, परळी शहर पोलीस स्टेशनचे पोलिस निरीक्षक रघुनाथ व संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय, जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष व पोलीस उपनिरीक्षक विजय यांच्या अधिपत्याखाली नियमभंग करणार्यांना चांगलेच चपेटीत घेवून दि.३१ जुलै २०२५ गुरुवार रोजी नियमभंग करणार्या १२६ वाहनांवर केसेस करुन ८६ हजार २०० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, जिल्हा वाहतुक शाखेने विशेष मोहिमे अंतर्गत परळी शहर व संभाजीनगर पोलीस स्टेशन हद्दीमध्ये बेकायदेशीर वाहनधारकांना लगाम लावावा व वाहनांच्या नियमामध्ये सातत्य राहावे या हेतूने गुरुवार रोजी पोलीस हवालदार पांडूरंग, पोलीस हवालदार चालक संतोष, विश्वजीत, सिध्दांत, प्रल्हाद, अमर, दत्ता यांनी रस्त्यावरील नो पार्किंग वाहनावर व रस्त्यावर वाहने उभे करुन वाहतुकीस अडथळा आणणार्या वाहनांवर तसेच विमा नसणे, पीयुसी नसणे, कागदपत्रांची पुर्तता नसणे या सदराखाली १२६ वाहनांवर केसेस करुन ८६ हजार २०० रुपयांचा दंड ठोठावून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनधारकांचे चांगलेच वाभाडं काढले आहे.



# परळी पोलिसांनी पकडला गंठण चोर

## मुद्देमाल जप्त करत संबंधितांना केला परत



**बीड । प्रतिनिधी**

पोलीस ठाणे परळी येथे दि.२६/११/२०२४ रोजी हलगे गार्डन या ठिकाणी शिव महाकथेची आयोजन करण्यात आले होते, त्यादरम्यान महाप्रसादाकरिता फिर्यादी महिला व इतर महिला अशा महाप्रसादासाठी असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन/ मंगळसूत्र असे चोरी झाली होती, त्यावरून पोलीस ठाणे परळी शहर येथे गुरन १७६/२४ प्रमाणे दाखल होता, सदर गुण्याचा तपास करून यातील आरोपी महिला यांचा बीड व धाराशिव येथे शोध घेऊन गुन्ह्याततील आरोपी महिला यांना गुन्ह्यात अटक करून चोरलेले मनी मंगळसूत्र

पान २ वर

# अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव साजरा

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरामध्ये अनिलराधे मित्र परिवाराच्या वतीने लोकशाहिर अण्णाभाउ साठे सार्वजनिक जन्मोत्सव दि. ३० जुलै २०२५ रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांच्या गायनाचा कार्यक्रम झाला.

कार्यक्रमाचे उद्घाटन बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांनी केले. अध्यक्षस्थांनी आधार सेनेचे संस्थापक अध्यक्ष दिपक थोरात हे तर मा. जिप सदस्या गयाबाई आवाड, सभापती जयदत्त नरवडे, उपसभापती श्रीहरी मोरे, आयोजक

पान २ वर



### १०५ वारणेचा वाघ कादंबरीचे वाटप

या साठे जन्मोत्सव सोहळ्यात हार फुलांचा खर्च न करता लोकशाहीर अण्णाभाउ साठे यांच्या विचारा प्रसार, प्रचार करणारी कादंबरी वारणेचा वाघ वाटप करण्यात आली. १०५ व्या जयंतीचे औचित्य साधुन १०५ कादंबरीचे वाटप यावेळी करण्यात आले.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून आमदार गोरखेंच्या कार्याचे कौतुक

## अ,ब,क,ड आरक्षण उपवर्गीकरणाचा निर्णय अंतिम टप्प्यात



**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुणे येथे आयोजित लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त साहित्य प्रकाशन समारंभ प्रसंगी अण्णाभाऊंच्या कार्याचे महत्त्व पुन्हा एकदा अधोरेखित केले. यावेळी बोलताना, देवेंद्र फडणवीस यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनातील अनेक प्रेरणादायी पैलू जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे सांगितले.
कार्यक्रमादरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अमित गोरखे यांनी सुरू केलेल्या माहितीनसलेले अण्णाभाऊ या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. या उपक्रमाचे उद्दिष्ट अण्णाभाऊंच्या जीवनातील अज्ञात गोष्टी समाजासमोर आणणे हे आहे. या प्रसंगी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले, अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित अनेक गोष्टी अजूनही अज्ञात आहेत. त्या गोष्टी समाजातील सामान्य माणसाला बळ देणाऱ्या, वंचितांना आवाज देणाऱ्या आहेत. त्यांचे हे कार्य जनमानसापर्यंत पोहोचवण्यासाठी आमचे सरकार प्रयत्नशील आहे. याच कार्यक्रमात देवेंद्र फडणवीस यांनी 'अ ब क ड'च्या मागणीसंदर्भात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली. ते म्हणाले, आपली आरक्षण उपवर्गीकरण 'अ ब क ड'ची मागणी अंतिम टप्प्यात आली आहे. या संदर्भात लवकरच अधिकृत घोषणा करण्याचे आश्वासन दिले आहे. या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री चंद्रकांत पाटील, राज्यमंत्री माधुरी मिसाळ, उपसभापती निलम गोऱ्हे, आमदार हेमंत रासने, आमदार सुनील कांबळे, आमदार विजय शिवतारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या घोषणेमुळे समाजाच्या दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या मागणीला न्याय मिळण्याची आशा पल्लवित झाली असून, अण्णाभाऊंच्या विचारांवर चालणाऱ्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# दादा येणार... मेन रोड स्वच्छ, गल्ली बोळयाचं काय? : शेख युनूस




**बीड । प्रतिनिधी**



बीड शहरात उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्हा पालकमंत्री अजित पवार हे बीड जिल्ह्या दौऱ्यावर येत असून मेन रोड स्वच्छ करण्यात येत आहे. पण गल्लीबोळाची घाण कधी काढणार हा नागरिकाला प्रश्न पडलेला आहे. काही भागात नाल्या वरून पाणी रोडवर येत आहे. त्यामुळे दुर्गंधी पसरत आहे, त्याचबरोबर रोगराईचे प्रमाण वाढलेले आहे. दूषित पाण्यामुळे मच्छर आणि त्यामुळे होणारे आजाराला नागरिकाला सामोरे जावे लागत आहे. त्याला जिम्मेदार फक्त नगरपरिषद आहे.
एकीकडे 'स्वच्छ बीड सुंदर बीड' मोहिमे अंतर्गत मुख्य कार्यकारी यांच्या मार्गदर्शनाखाली साफसफाई चालू आहे परंतु मुकादम, सुपरवायझरच नाहीतर स्वच्छता निरीक्षक सुद्धा ऐकायला तयार नाही. दुर्गंधीमुळे नागरिकाचे आरोग्य धोक्यात येत आहे. काही जागेवर तर श्वास घेणे सुद्धा मुश्किल झाले आहे तरी माझी माननीय पालकमंत्री यांना विनंती आहे की, त्यांनी बीड नगरपरिषद तसेच जिल्ह्यातील प्रत्येक नगरपरिषद यांची बैठक घेऊन 'स्वच्छ जिल्हा, सुंदर जिल्हा' ठेवण्याचे आदेश द्यावे.

# ॲड. आदर्श अरुणराव जाधव यांना २०२५ चा समाजरत्न पुरस्कार प्रदान

**बीड । प्रतिनिधी**



न्याय, सत्य आणि सामाजिक बांधिलकीचे भान असलेल्या कार्यकर्त्यांच्या पंक्तीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे ॲड. आदर्श अरुणराव जाधव यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच आदर्शमाता कांताबाई बाबुराव मोहिते प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २०२५ सालचासमाज रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.
हा पुरस्कार सामाजिक समता, न्यायहक्क, युवक मार्गदर्शन, वंचितांचे सक्षमीकरण, आणि कायद्यातून सामाजिक परिवर्तन या क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची पावती आहे. ॲड. जाधव यांनी आपल्या महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटने च्या माध्यमातून व राहुल दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस परिवार, पोलीस कर्मचारी पोलीस पाल्य यांचा विविध प्रश्नासाठी नेहमी च काम केले व त्या समस्या सोडवल्या तसेच त्यांचा वकिली कार्यातून अनेक गोरगरीब, शोषित, उपेक्षित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले आहे. ॲड.जाधव हे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना मध्ये राज्य सचिव (लीगल सेल) या पदावर कार्यरत असून महाराष्ट्रभर समाजासाठी, पोलीस परिवारासाठी काम करत आहेत.
पुरस्कार प्रदान समारंभात विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते विश्वास मोहिते (संस्थापक अध्यक्ष, दिपक मोहिते डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच) उपाध्यक्ष असलम शेख उपाध्यक्ष भारतीय ग्रामीण वार्ताहर विकास परीषद, विकास भैय्या शेलार (लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती अहिल्या नगर) जिल्हा प्रमुख संपतराव मोहिते पुरस्कार निवड समिती अध्यक्ष व मान्यवर उपस्थित होते. यावेळी बोलताना अनेकांनी ॲड. जाधव यांच्या कर्तृत्वाचे कौतुक करताना त्यांना तरुणांच्या आशेचा दीपस्तंभ अशी उपमा दिली.
या सन्मानाबद्दल ॲड. जाधव म्हणाले, हा पुरस्कार माझ्यासाठी सन्मानापेक्षा जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. समाजासाठी मी अधिक निष्ठेने कार्यरत राहीन, हेच अभिवादन अण्णाभाऊ साठेंना असेल. व समाजाची सेवा करत राहील. हा माझा प्रथम पुरस्कार मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आई वडील यांना समर्पित करतो. त्यांच्या या यशामुळे मित्र परिवार व सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे. नव्या पिढीसमोर एक नवा आदर्श उभा करणाऱ्या या कार्यकर्त्याचे मनःपूर्वक अभिनंदन!

# विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवावे : पी.व्ही. बनसोडे

**बीड । प्रतिनिधी**

जग बदल घालुनी घाव... सांगून गेले मज भीमराव हया नुसार आपल्या संपूर्ण जीवनाची वाटचाल करणाऱ्या लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंती दिनी महामानव अभिवादन ग्रुपने सुरू केलेल्या तिसऱ्या मोफत शिकवणी वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतीमेस विनम्र अभिवादन करून कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षपदी लाभलेले माजी सीईओ जिप पी.व्ही.बनसोडे यांनी जय भीम बुद्ध विहार पूरग्रस्त कॉलनी येथे विद्यार्थी व पालकांशी संबोधितांना उद्गार काढले की शिस्त, बालपणीच्या चांगल्या सवयी व पुस्तकाच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवता येते. कार्यक्रमास महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले यांनी करून प्रास्ताविकात ग्रुपची व पुढील नियोजनाबद्दल सविस्तर माहिती सांगितली.
कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.डॉ.उत्तमराव साळवे, सेवानिवृत्त उपनिबंधक हनुमंत कांबळे, प्रा.बी.व्ही. काळे, प्रा.श्रीराम जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विचार मंचावर प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी.वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस.वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतीमेस पुष्प व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मोफत शिकवणी वर्गाचे रवींद्र टेकाळे यांना शिकवणी



वर्गाकरिता विद्यार्थ्यांना लागणारे शालेय साहित्य ९६ वह्या व १०० पेन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने देण्यात आले. मुलांची वाचन संस्कृती वाढवण्याकरिता वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे डी.जी वानखेडे यांनी ५१ पुस्तकांचा संच ३९ व्या केंद्र असलेल्या मान्यवरांच्या हस्ते प्रकाश जावळे यांना सुपूर्द केला. या पुस्तकांचे वाचन करून महामानवाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा ही अपेक्षा व्यक्त केली.
प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.उत्तमराव साळवे यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत शिक्षणाचे महत्त्व व पालकांनी घ्यावयाची काळजी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली.प्रा. श्रीराम जाधव, बी.व्ही.काळे, प्रशांत वासनीक यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनमोल विचार समजावून सांगितले. मोफत शिकवणी वर्गाकरिता दानदाते प्रा.डॉ. नामदेव शिनगारे, प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड प्रा.श्रीराम जाधव, प्रा. बी व्ही काळे व हनुमंत कांबळे यांनी भरघोस अर्थसहाय्य केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन अँड.तेजस वडमारे यांनी केले कार्यक्रमास, प्रा.अशोक गायकवाड, ए.एल.अवसरमोल, काशिनाथ वाघमारे, इंजि. वसंतराव तरकसे, आर.डी.चक्रे, बी.जी दळवी, एस.एस.सोनवणे, माया ससाने, दादाहरी गायकवाड, असंख्य महिला व उपासक-उपासिकांची उपस्थिती होती. योगेश शिंदे, बप्पा जावळे, प्रकाश जावळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बहुमोल परिश्रम घेतले. सरनातयणे व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# जाहिरात करणाऱ्यांवर व जुगार चालवणाऱ्यांवर पोलीस अधीक्षक बीड कारवाई करणार का : विजय गायकवाड






**बीड । प्रतिनिधी**

भारत देशासह महाराष्ट्र मध्ये बीड जिल्ह्यासह इतर तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर जंगली रमी ऑनलाइन जुगार चे प्रमाण मोठ्या संख्येने वाढले असून यामध्ये तरुण व युवक कर्जबाजारी होत आहे, त्यामुळे त्यांचे कुटुंब उध्वस्त होतानाचे चित्र सध्या बीड जिल्ह्यासह देशांमध्ये निर्माण झालेले आहे. ऑनलाइन जुगारामुळे मोठ्या प्रमाणावर कर्जबाजारीपणाला कंटाळून आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढलेले आहे याला प्रशासनाने आळा घालण्याची मागणी जनप्रहार सामाजिक संघटनेचे अध्यक्ष विजय गायकवाड यांनी दि.१ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनात पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे संबंधित जाहिरात करणारे व ऑनलाइन जुगार चालणाऱ्या वर योग्य ती फौजदारी कारवाई करण्याची मागणी केलेली आहे.
सदर निवेदनाचा बीड पोलीस अधीक्षक गांभीर्यपूर्वक विचार करून संबंधितांवर योग्य ती फौजदारी कारवाई करणार का याकडे जनतेचे लक्ष लागून राहिले आहे. बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन जुगार चे प्रमाण वाढलेले असून यामध्ये मोठ्या प्रमाणावर सामान्य कुटुंबाची व त्यांच्या परिवारातील प्रमुखावर आत्महत्या करण्याची वेळ येत आहे. सदर निवेदनाचा पोलीस अधीक्षक बीड यांनी दखल घ्यावी अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी दिलेल्या पत्रकात जनप्रहार सामाजिक संघटनेचे अध्यक्ष विजय गायकवाड यांनी कळवले आहे.

# राजस्थानी विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक त्यांची पुण्यतिथी उत्साहात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

पेठ बीड भागातील मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयात लोकशाहिर अण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाल गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी दि.१ऑगस्ट २०२५ शुक्रवारी उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहिर अण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या प्रतिमेला कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक सोहनी सर, प्रमुख वक्ते तंबरे सर, मंत्री सर, सुराणा मॅडम, घोडके मॅडम यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.
यावेळी ५० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी भाषणे केली.



यात काही विद्यार्थ्यांनी इंग्रजीतून भाषणे केली हे विशेष. यानंतर प्रमुख वक्त्यांनी अण्णाभाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या जीवनावर प्रकाश टाकला व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप सोहनी सर यांनी केले. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन तोष्णीवाल सर व तौर मॅडम यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक जाधव मॅडम यांनी करून आभार उबाळे सर यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक-शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

# तीस वर्षांची निष्ठा आणि संघर्ष ओळखून अविनाश नाईकवाडे यांना बीड जिल्हाध्यक्षपदाची संधी द्यावी

## सामाजिक कार्यकर्ते राहुल गवळी यांची मागणी

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदासाठी अविनाश नाईकवाडे यांना संधी देण्यात यावी, अशी ठाम मागणी सामाजिक कार्यकर्ते राहुल गवळी यांनी केली आहे. गेल्या तीन दशकांपासून नाईकवाडे हे पक्षाशी एकनिष्ठ राहून सातत्याने पक्षवाढीसाठी कार्यरत आहेत, याची दखल पक्षाने घेतली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.
राहुल गवळी यांनी सांगितले की, अविनाश नाईकवाडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या संघर्षाच्या काळात पक्षाचा झेंडा खाली न होता अखंडपणे काम केले. विशेषतः बीड जिल्ह्यात धनंजय मुंडे यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी त्यांचे योगदान अमूल्य आहे. नाईकवाडे यांना यापूर्वी पक्षाकडून जिल्हा उपाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली होती, मात्र त्यांच्या तीन दशकांच्या कार्यकर्तृत्वाला आणि निष्ठेला सन्मान देत यावेळी जिल्हाध्यक्षपदाची संधी मिळणे अपेक्षित आहे, अशी भूमिका गवळी यांनी मांडली आहे.
सध्या बीड जिल्ह्यात राष्ट्रवादी अजित पवार गटाची संघटनात्मक बांधणी पुन्हा सुसज्ज करण्याचा प्रयत्न सुरू आहे. अशा काळात स्थानिक पातळीवर चळवळीतून तयार झालेले आणि निष्ठावान कार्यकर्ते पुढे आल्यास पक्षाला अधिक बळ मिळेल, असे



अनेक कार्यकर्त्यांचे मत आहे. गवळी पुढे म्हणाले, संघर्ष काळात सोबत असलेल्यांना पुढे आणल्याशिवाय पक्ष बळकट होणार नाही. त्यामुळे निष्ठावंत आणि जमिनीवरचे नेतृत्व देणाऱ्या अविनाश नाईकवाडेंना ही संधी देणे हे पक्षहिताचे पाऊल ठरेल.

# परिवर्तनाचा साक्षीदार : पत्रकार उत्तम हजारे

तब्बल दीड डझन दैनिकांत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पत्रकारितेचा अनुभव घेतलेले बीड येथील ज्येष्ठ पत्रकार व आमचे मित्र उत्तम हजारे यांच्या वाढदिवसानिमित्त (दि.२ ऑगस्ट) मुक्तचिंतन
पत्रकारितेचे माझे शिक्षण व प्रशिक्षण संपल्यानंतर पहिली नोकरी मिळाली ती लोकमत बीड कार्यालयात. माझा हाच जिल्हा असल्यामुळे ईथल्या राजकीय -सामाजिक चळवळीची माहिती बर्यापैकी होती. बीडमध्ये आठ वर्षे पत्रकारिता करीत असताना ज्या काही पत्रकार मित्रांशी स्नेहबंध जोडले गेले अशापैकी एक असलेले उत्तम हजारे. लोकाशाच्या बीड जिल्हा आवृत्तीचे प्रमुख म्हणून सध्या ते कार्यरत आहेत. आज उत्तमभाऊचा वाढदिवस, या निमित्ताने झुंजार पत्रकार मित्राविषयी हा शब्द प्रपंच..
फुले -शाहू -आंबेडकरी विचारांची शिदोरी सोबत घेऊन गेल्या अडीच दशकांपासून ते माध्यम क्षेत्रात कार्यरत आहेत. पत्रकारितेच्या या प्रवासात सध्या लोकाशा परिवारात ते चांगलेच रमले आहेत. लोकाशा परिवारातील हा त्यांचा दुसरा वाढदिवस. समाजाभिमुख पत्रकारितेचे एक वर्तुळ पूर्णत्वास जाताना आज दिसत आहे. नवाकाळ, पुढारी, पुण्यनगरी, झुंजार नेता, सम्राट आदी दैनिकात त्यांनी पत्रकात त्यांनी विविध पदावर कामे केली आहेत. अग्रलेखाचे बादशहा मा. निळूभाऊ खाडिलकर, पदमश्री डॉ. प्रतापसिंह जाधव, मुरलीधर बाबा शिंगोटे, मोतीराम वरपे, बबन कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांची पत्रकारिता बहरली. या दैनिकांमध्ये केवळ बीडच नव्हे तर मराठवाडयाची बातमीदारी करायची संधी त्यांना मिळाली. आठ- दहा वर्षे बीड येथूनच मराठवाडयातील आठही जिल्हयातील प्रश्न पुढारी व नवाकाळमधून त्यांनी मांडले. या दैनिकांशी आजही त्यांचा स्नेह कायम आहे. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना मराठवाडा, लोकमत, चंपावतीपत्र, रिपोर्टर, सिदंफणा, पार्श्वभूमी, सोलापुर संचार, नगर सार्वमत यासह विविध दिवाळी अंकात साहित्य व विविध सदरात त्यांनी लेखन केले. अगदी सुरुवातीच्या काळात ज्येष्ठ संपादक नरेंद्र कांकरिया यांच्या संकेत व परळीच्या मराठवाडा साथी दैनिकात शिकाऊ पत्रकारिता केली. मुंबईतील एक वर्षाच्या काळात मुंबईतील विविध दैनिकाशी त्यांचा सबंध आला.



तब्बल पंचवीस वर्ष म्हणजेच १९९५ पासून आजपर्यंत जनतेसाठी पत्रकारिता त्यांना करता आली. माध्यमे बदलती, पत्रकारितेची साधने बदलली, कोरोना-लॉकडाऊन काळात पत्रकारिता व माध्यमे संकटात आली. आता डिजीटल माध्यमाचे युग आहे, या युगातही प्रिंट मिडीया हाच विश्वास पात्र आहे, हे नव्याने सिद्ध करण्याची वेळ आली आहे. अशा वेळी अनेक दैनिकात आलेला अनुभव पाठिशी घेत लोकाशाचे मुख्य संपादक तथा समाजभूषण विजयराज बंब यांच्या मार्गदर्शनाखाली ती कार्यरत आहेत. लोकाशा ग्रुपचे व्यवस्थापकीय संचालक रोशन बंब यांनी दिलेली जबाबदारी ते पार पाडीत आहेत. पत्रकारितेच्या माध्यमातून जनसामान्याचे हित आपली जात झाले यासाठी कार्यरत राहिले आहेत. बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजुरांचा प्रश्न रेल्वेचा प्रश्न यासह असंख्य विषयांवर त्यांनी वृत्तमालिका लिहिलेल्या आहेत. ज्या लोकशा दैनिकाचे बीड जिल्हा निवासी संपादक प्रति सांभाळत आहेत याचा मी संस्थापक राहिलेलो आहे. माझा सहकारी संतोष जोगदंड हा उत्तम आणि मला जोडणारा दुवा आहे. तर बंब साहेब म्हणजे अत्यंत दिलदार व मोठ्या मनाचा माणूस आहे. त्यांच्यासोबत दोन वर्ष मला व्यवसायिकता, धाडस व चिकाटी हे गुण शिकता आले. बंब साहेब दररोज कार्यालयात आले काय 'प्रॉलेम' आहे, असे म्हणत असत. 'प्रॉब्लेम'चा साठी त्यांचा हा खास शब्द. शब्दाचा सोडा मात्र जगातील कुठलाही प्रॉब्लेम आला तर ते सोडवण्यासाठी लागणारा पैसा आणि धाडस या दिलदार माणसाकडे असल्याचे मी जवळून अनुभवले आहे. पत्रकारितेत शब्दांपेक्षाही आकड्यांना जास्त महत्त्व असते हे मला कळून चुकले. उत्तम हजारे यांनी बंब साहेबांची साथ प्रामाणिकपणे निभवावी. यातच त्यांची प्रगती आहे असे आम्हा मित्रांना वाटते. यातच त्यांचे सौख्य सामावलेले आहे.
परिवर्तनवादी विचारधारा हा त्यांचा वसा आहे आणि वारसा आहे. परिवर्तन या शब्दात 'वर्तन' देखील समाविष्ट असते याची जाणीव त्यांनी विसरता कामा नये. तर अशा या पत्रकार मित्राने शिरसमार्ग (ता. गेवराई) येथून सुरू केलेली वाटचाल आज वयाच्या पन्नाशीत पोहोचली आहे. पत्रकारीतेची पंचविशी अर्थात रौप्य महोत्सव पूर्ण झाला आहे. एक मुलगा डॉ. सुजित हजारे हा मेडीकल ऑफीसर झाला आहे तर दुसरा नोबेल हजारे हा तैवान देशात उच्च शिक्षण घेत आहे.
पत्रकार म्हणून फार मोठा पैसा नाही मिळविता आला मात्र नावलौकिक खूप कमावला आहे. अन्य मंडळीप्रमाणे लुच्चेगिरी अन् हुजेरीगिरी उत्तमच्या रक्तातच नाही. काही मंडळींनी तर नेत्यांच्या मागे पुढे फिरून अन् अधिकाऱ्यांची दलाली करून चांगला जमिनी - जुमला कमावला आहे. जुमलेबाजी करणे ऊत्तमला कधीच जमले नाही. भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला स्वाभिमानाचा विचार हा त्यांचा श्वास आहे आणि ध्यासही. अशाप्रकारे स्वतःसोबत समाजाचे परिवर्तन घडण्याची क्षमता असणाऱ्या या पत्रकार मित्राला वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा. या निमित्ताने तुमच्या अत्यंत कष्टमय जीवनाची वाटचाल म्हणताना शेवटी मजरूह सुल्तानपुरी यांच्या ओळी मला आठवत आहेत...

**मैं अकेला ही चला था**
**जानिब-ए-मंज़िल मगर,**
**मगर लोग साथ आते रहे**
**और कारवाँ बनता गया...**

**संजय शिंदे/मुक्तसंवाद**
डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छ. संभाजीनगर,
९५७९०४४११५

पान १ वरून...

## अनिलराधे मित्र मंडळाच्या वतीने मोठ्या उत्साहात

अनिलराधे कांबळे, लहुजी विद्रोही सेनेचे भास्कर शिंदे, युवा नेते अमोल शेरकर, राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष राजेश मेंडके, मा. उपनगराध्यक्ष दिपक मुंडे, मानवी हक्क अभियानचे जिल्हाध्यक्ष राजेश क्षिरसागर, प्रहार संघटनेचे तालुकाध्यक्ष हरीष जाधव, सरपंच नारायण भले, सरपंच अजय शिंदे, सरपंच राज अर्जुन, सरपंच रूद्रा कुरे, सरपंच आसाराम शिरसागर, एकनाथ मस्के, सचिन जावळे, उध्दव अरे, पत्रकार सुभाष नाकलगावकर, सुनिल थोरात, राज गायकवाड, हनुमंत तुपसौंदर, सदानंद प्रधान, प्रदीप तांबे, अभिजित देडे, किरण ढगे, मल्हारी ढगे, आकाश थोरात, विलास लोंढे, दत्ता कांबळे, विशाल कांबळे, किरण कांबळे, प्रविण कांबळे, धुराजी कांबळे, सागर कांबळे, मनोज कांबळे, रोहित कांबळे, पांडू कांबळे, राजू कांबळे, धुराजी आडागळे, श्री. अलझेंडे यांची उपस्थिती होती. मोठ्या थाटात कार्यक्रम पार पाडला. शाहीर शितल साठे, युवराज ढगे, गायक सुमित साळवे आणि संच यांच्या गायनाचा कार्यक्रमाने जन्मोत्सवाला रंगत आणली. जन्मोत्सव यशस्वी करण्यासाठी जयंती कमिटीचे अध्यक्ष विक्रम कांबळे, संयोजक रोहित भिसे, उपाध्यक्ष संकेत कांबळे, कोषाध्यक्ष युवराज कांबळे, सहकोषाध्यक्ष शुभम भिसे, सिध्देश्वर कांबळे, शाम कांबळे, प्रदीप कांबळे, सुहास क्षिरसागर, मयूर कांबळे यांचेसह अनिलराधे कांबळे मित्र परिवाराच्या सदस्य, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## परळी पोलिसांनी पकडला गंठण चोर

व सोन्याची चैन असे गुन्ह्यात जप्त करून गुन्हा तपास करून कोर्टात दाखल करण्यात आला होता. आज रोजी सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली चैन व मनी मंगळसूत्र असे यातील फिर्यादी महिला नामे कमलाबाई मोतीलाल बांगड राहणार परळी यांचा मुलगा नामे मनोज कुमार मोतीलाल बांगड यांना एक चैन रुपये २,५०,०००/ किमतीची २५ग्राम वजनाची परत करण्यात आली आहे. त्यावरून फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय यांनी पोलिसाच्या कामावर समाधान व्यक्त केले आहे. सदरची कारवाई पो नि. आर के नाचण यांच्या अधिपत्याखाली पोहे गोविंद भताने पोहे घटमळ पो ना/पांचाळ यांनी केली आहे.

# पालवणमध्ये मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

## विविध सामाजिक उपक्रम कार्यक्रम संपन्न; निखिल मस्के यांचा अभिनव उपक्रम, ६२ युवकांनी केले रक्तदान

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पालवण या गावा मध्ये मराठा समाजाचे क्रांतीसुर्य मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, पालवण या गावातील युवा नेते निखिल मस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ६२ युवकांनी रक्तदान केले. याप्रसंगी वृक्ष लागवड तसेच दंत तपासणी इत्यादी कार्यक्रम घेण्यात आले.



पालवण गावचे युवा नेतृत्व निखिल मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालवण गावातील जिल्हा परिषद शाळेसमोर भव्य रक्तदान शिबिर संपन्न झाले. बीड शहरातील पालवन या गावात मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्ह्यामध्ये सध्या रक्ताचा तुटवडा कमी आहे. या पार्श्वभूमीवर या युवकांनी रक्तदान शिबिराचे आयोजन केले होते. सदरील रक्तदान शिबिर हे पालवण गावचे युवा नेतृत्व निखिल मस्के पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पालवन या गावात जिल्हा परिषद शाळेसमोर भव्य रक्त दान शिबीर ठेवण्यात आले.

यावेळी या रक्तदान शिबिराला उपस्थित सामाजिक कार्यकर्ते, परशुराम गुरुखुदे, राष्ट्रवादी पक्षाचे नेते बप्पासाहेब घुगे, मनसे नेते सोमेश कदम, सामाजिक कार्यकर्ते कचचू जगताप, स्वपनील वरपे पाटील, युवा सेना जिल्हाप्रमुख गणेश शिराळे पाटील युवा सेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे पाटील, इंजि. अर्जुन मस्के पाटील, भगवान मस्के, ओमकार डुकरे, अजय शेळके, अभिषेक जटाळ, अशोक मस्के, विलासराव मस्के, रामप्रभू मस्के, बाबासाहेब मस्के, विष्णू मस्के, सुमित दौंड, संतोष मस्के, लखन मस्के, विशाल मस्के, सुदाम मस्के, अमोल शेळके, सक्षम मस्के, विजय मस्के, शहादेव मस्के, तुषार निंबाळकर, परशुराम गांगुर्डे, ओमकार मस्के, महेश पवार, लक्ष्मण मस्के, अजय मस्के, शरद निकम, तेजस मस्के, निलेश मस्के, आशोक पवार, गोविंद मस्के, चंदन वाकुरे, तुषार मस्के, रमेश नाटकर, शिवराज गायकवाड, अभी खांडे, अमोल बारस्कर, ऋषी गिराम, सिद्धू धोंडगे, गोपाल सव्वाशे, आनंत वायबसे व आदी युवक पालवन ग्रामस्थ मंडळी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने पत्रकार तात्या गवळी सन्मानित

**केज । प्रतिनिधी**

आपल्या लेखनातून सामान्य माणसाला न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकार तात्या गवळी कायम तत्पर असणारे चळवळीत सक्रिय राहुन आंबेडकर चळवळीतील बुलंद तोफ अल्पावधीतच लोकप्रिय होऊन सर्वांसाठी आपलेसे वाटणारे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त कै.प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने २०२५ च्या लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्काराने पत्रकार तात्या गवळी यांना सन्मानित करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, पत्रकारिता, क्रीडा क्षेत्रासह विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना कै.प्रमोद लांडगे युवा मंचच्या वतीने पुरस्कार देण्यात येत आहे.



पत्रकारीतेच्या व सामाजिक कार्यातून सतत अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध लेखणीच्या माध्यमातून उपेक्षितांना न्याय मिळवून देत आहेत. पत्रकार तात्या गवळी हे त्यांच्या निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अन्याला वाचा फोडून गोरगरिबांना सतत न्याय देण्याचे काम करत आहेत त्यांच्या कार्याची दखल घेत कै.प्रमोद लांडगे विचार मंचच्या वतीने पत्रकार तात्या गवळी यांना २०२५ चा लोकशाहीर झुंजार पत्रकार पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे. यावेळी पुरस्कार सत्कारमूर्ती पत्रकार तात्या गवळी, कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून नगराध्यक्ष सौ.सीताताई बनसोड तर प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते राजूभाई इनामदार, गटनेते भाऊसाहेब गुंड, युवा नेते लखन भैय्या हजारे, वंचितचे प्रवीण मस्के, जनविकास फाउंडेशनचे सचिव विजय लांडगे, दैनिक बीड युवामंतचे संपादक अशोक नागरगोजे, वादळ महाराष्ट्र चे संपादक मुबाशीर खतीब, दलित अन्याय अत्याचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष रोहित कसबे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले. यावेळी जयंती उत्सव समितीच्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकीत उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन करून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा दिल्या.

यावेळी पुरस्काराला उत्तर देताना पत्रकार तात्या गवळी म्हणाले की, हा पुरस्कार माझ्यासाठी प्रेरणा देणारा आहे या पुरस्काराची प्रेरणा घेऊन मी पत्रकारितेत व सामाजिक कार्यात अग्रेसर राहून अन्याला वाचा फोडून गोरगरिबांना न्याय देण्याचे प्रमाणिक काम करेल. पुढे बोलताना गवळी म्हणाले की, या पुरस्काराच्या माध्यमातून समाज बांधवांनी माझ्या खांद्यावरती जबाबदारी दिली आहे ती जबाबदारी प्रामाणिकपणे संभाळण्याचे काम करेल. यावेळी भीम नगर, सिद्धार्थ नगर भागातील युवक-युवती, महिला, नागरिक व जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, कोषाध्यक्ष यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन लखन हजारे यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक व उपस्थित त्यांच्या आभार रोहित कसबे यांनी मानले.

# संतोष ससाने यांची कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना नाशिक प्रदेश कार्यकारणी कोषाध्यक्षपदी निवड

**आष्टी । प्रतिनिधी**

एसटी महामंडळातील हजारो मागास वर्गीय तथा सर्वच कर्मचाऱ्यांच्या हितासाठी कार्यकरणारी नोंदणीकृत संघटना म्हणुन ओळख असलेली कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटनेच्या नाशिक, अ.नगर, धुळे, जळगाव विभागाच्या नाशिक प्रदेश कार्यकारणी निवडीची बैठक पंचवटी, नाशिक येथे शनिवार दि.१२-०७-२०२५ रोजी पार पडली. या बैठकीत संघटनेचे कार्य अधिक गतिमान करण्यासाठी नूतन कार्यकारणी गठीत करण्यात आली.



यात अध्यक्ष- देविदास पवार, लेखाकार शहादा आगार धुळे विभाग, सचिव शशिकांत ढेपले, सहा.वाहतूक निरीक्षक नाशिक -१ नाशिक विभाग, कोषाध्यक्ष संतोष पांडुरंग ससाने, चालक तथा वाहक तारकपुर आगार अहिल्यानगर विभाग, सदस्यपदी दिनकर कौतिक वाल्हे, सेवानिवृत्त जळगाव विभाग, शैलेश रामकिशन ननवरे, चालक जळगाव आगार जळगाव विभाग, सुनिल नारायण ननावरे, चालक जळगाव आगार जळगाव विभाग, कुणाल रमेश वाघ, लिपिक विभागीय कार्यालय धुळे विभाग, विनोद धर्मा वळवी, वाहक नंदुरबार आगार धुळे विभाग, संदिप मनसुक गायकवाड, वाहक संगमनेर आगार अहिल्यानगर विभाग, ज्ञानेश्वर चंद्रसेन पवार, चालक श्रीरामपूर आगार अहिल्यानगर विभाग, अशोक पुंजाजी बोंबले, वाहतूक नियंत्रक, पंचवटी आगार, नासिक विभाग, संजय नामदेव मोहिते, सहाय्यक वाहतूक निरीक्षक, नाशिक १ आगार, यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

यावेळी मूळ आष्टी तालुक्यातील धामणगांव येथील रहिवाशी असलेले व सध्या अहिल्यानगर विभागातून तारकपूर आगारात कार्यरत संतोष ससाने यांची कोषाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल अहिल्यानगर विभागाचे विभागाध्यक्ष काशिनाथ सुलाखे पाटील व विभागीय जनरल शशिकांत वाकचौरे, तारकपूर आगाराचे अध्यक्ष विशाल पप्पाल व इतर सर्व पदाधिकारी व कर्मचारी सह आष्टी तालुक्यातील सर्व मित्र परिवाराने अभिनंदन केले.



# गजानन विद्यालयात साहित्यरत्न आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

**नवगण राजुरी । प्रतिनिधी**

येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रशांत पवळ हे होते.

यावेळी प्रथम लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी, स्थानिक गुन्हा शाखेचे पो.नि. शिवाजी बंटेवाड, ह.भ.प. अमृत स्वामी महाराज, संजय मचाले यांची उपस्थिती होती. याप्रसंगी शाळेतील सन २०२४-२५मधील इयत्ता दहावी व बारावी तील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी यांनी स्पर्धा परीक्षे बद्दल अनमोल असे मार्गदर्शन केले. पो.नि.बंटेवाड यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना क्यू आर कोड बद्दल सविस्तरपणे माहिती देऊन पोलीस प्रशासन विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी अहोरात्र सज्ज आहे असे सांगितले.अमृत स्वामी महाराजांनी आपल्या वाणीतून मंत्र मुग्ध केले. अध्यक्षीय भाषणात प्रा.प्रशांत पवळ यांनी साहित्यिक क्षेत्रात अण्णाभाऊ साठे यांचे खूप मोठे योगदान आहे. आणि लोकमान्य टिळक यांच्या जीवनाचा आदर्श घ्यावा व इच्छाशक्ती प्रबळ असेल तर माणूस यशस्वी झाल्याशिवाय राहत नाही असे आपल्या मनोगतातून व्यक्त केले. याशिवाय शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी अभिजीत खाडे, भागवत आघाव, शशिकांत पवार, मारुती वाघ, अजय ससाणे, गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे उपमुख्यध्यापक शिंदे.एस.एस, पर्यवेक्षक दगडे.व्ही.एन यांच्यासह ग्रामस्थ, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयदिप सरवदे यांनी केले तर श्रीमती दिवे मॅडम यांनी उपस्थितांचे आभार मानले. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# पवनराजे इंग्लिश स्कूलमध्ये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन




**केज । प्रतिनिधी**

पवनराजे इंग्लिश स्कूल केज येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन उत्साहात पार पडले.समाज परिवर्तनाचे प्रबळ साधन म्हणून कार्य करणाऱ्या साठे यांचे विचार आणि कार्य नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा उद्देश या कार्यक्रमामागे होता. कार्यक्रमाचे अध्यक्ष पवनराजे इंग्लिश स्कूल चे संस्थापक अध्यक्ष खंडेराव चौरे होते. त्यांनी आपल्या भाषणात अण्णाभाऊ साठे यांचे जीवन कार्य विद्यार्थ्यां समोर उलगडले. ते म्हणाले की, साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर ते खऱ्या अर्थाने समाजासाठी लढणारे युगपुरुष होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलित, गरीब, मजुरांच्या न्यायासाठी वाहिले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक मुख्याध्यापक अशोक मस्के सर व घुले सर होते. अशोक मस्के सर यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून सांगितले की, आजच्या पिढीने साठे यांच्या जाज्वल्य संघर्षा तून प्रेरणा घेणे गरजेचे आहे. शिक्षण, मेहनत आणि सामाजिक भान हे त्यांच्या कार्याचे मूळ होते. घुले सर यांनी आपल्या मनोगतातून साठे यांच्या साहित्याची सामाजिक जाणीवेची खोली उलगडली. त्यांनी सांगितले की,'फकिरा', 'बारखान्या' या सारख्या कादंबऱ्यांतून साठे यांनी सामाजिक विषमता, अन्याय आणि दडपशाहीविरुद्ध संघर्ष उभा केला. कार्यक्रमात दळवे मॅडम यांनी देखील मनोगत व्यक्त करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी केवळ पुस्तकी ज्ञानापुरते मर्यादित न राहता समाजाच्या वास्तव समस्यांकडे सजग दृष्टीने पाहिले पाहिजे. साठे यांच्या जीवनातून ते शिकता येईल.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अजय भांगे सर यांनी केले. त्यांनी आपल्या शैलीत कार्यक्रमाला एक सुसंवादात्मक स्वरूप दिले. तर कार्यक्रमाच्या शेवटी अश्विनी मॅडम यांनी उपस्थित मान्यवरांचे, शिक्षकांचे व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या कार्यक्रमास चौरे मॅडम, डि.एस.चौरे सर, पठाण सर, पारखे मॅडम, केदार मॅडम, जाधव मॅडम, टेकाळे मॅडम, मुळे मॅडम, प्राची मॅडम, संजना मॅडम, अक्षता मॅडम, प्रगती मॅडम, अमृता मॅडम, लक्ष्मी मॅडम, सानिया मॅडम, विशाल सर, राऊत सर, काळे सर, निखिल भांगे सर यांच्यासह शाळेतील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिरूर कासार शहरामध्ये लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

शिवसेना उद्धवजी बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या वतीने सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीस उपस्थित राहून मनोगत व्यक्त केलं शिरूर कासार शहरांमध्ये अण्णाभाऊ साठे यांची जयंती जल्लोसात साजरी झाली यावेळी उपस्थित शिरूर कासार शहराचे नगराध्यक्ष व सर्वेसर्वा रोहिदास भाऊ पाटील गाडेकर यांच्यासह सर्व शिरूर शहरातील नगरसेवक सर्व पक्षातील पदाधिकारी नेते मंडळी उपस्थित होते.



अण्णाभाऊ साठे (१ ऑगस्ट १९२० - १८ जुलै १९६९) हे एक महान समाजसुधारक, लोकशाहीर, लेखक, आणि लोककवी होते. त्यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे होते. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील वाटेगाव येथे झाला. अण्णाभाऊंनी समाजातील गरीब, वंचित आणि शोषित वर्गाच्या वेदना आपल्या साहित्यातून मांडल्या. त्यांनी लावणी, पोवाडा, कथा, कादंबरी, नाटक आणि प्रवासवर्णन अशा विविध साहित्य प्रकारांमध्ये लेखन केले. त्यांच्या साहित्यातून सामाजिक विषमतेवर आणि गरिबीवर तीव्र प्रहार केला.

संयुक्त महाराष्ट्र चळवळ: अण्णाभाऊ संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील एक महत्त्वाचे सदस्य होते. त्यांनी पोवाडे आणि गाण्यांच्या माध्यमातून लोकांना या चळवळीत सहभागी होण्यासाठी प्रेरित केले. लेखन कार्य: 'फकिरा', 'वैजयंता', 'चिखलातील कमळ', 'वारणेचा वाघ' यांसारख्या प्रसिद्ध कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. त्यांच्या 'फकिरा' या कादंबरीला राज्य सरकारचा पुरस्कारही मिळाला. कलाकार आणि लोकशाहीर: अण्णाभाऊंनी आपल्या शाहिरीतून लोकांमध्ये जागृती केली. त्यांनी 'लाल बावटा कला पथक' या संस्थेची स्थापना केली आणि या माध्यमातून सामाजिक विषमतेवर प्रहार केला. त्यांनी अनेक गाणी आणि पोवाडे लिहून लोकांना एकत्र आणण्याचे काम केले. अण्णाभाऊ साठे यांचे कार्य हे केवळ साहित्यापुरते मर्यादित नव्हते, तर त्यांनी आपले जीवन समाजातील दुर्बळ घटकांच्या हक्कांसाठी लढण्यात व्यतीत केले. त्यांच्या कार्यामुळे ते 'लोकशाहीर' म्हणून ओळखले जातात आणि त्यांचे नाव आजही आदराने घेतले जाते.



साहित्य संस्कृतीचे पुरस्कारकर्ते साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना विनम्र अभिवादन करताना पत्रकार दत्तात्रय मुजमुले राज्य सचिव पुरोगामी पत्रकार संघ, भारत संस्थापक अध्यक्ष साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे सेवाभावी संस्था, नायगांव, ता. केज



लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती दिनी महामानव अभिवादन ग्रुप तर्फे पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन.



लोकशाहीर आण्णाभाऊ साठे, शाहीर, कथाकार व कादंबरीकार यांची जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी आर्वी व तरडगाव येथील ग्रामस्थ मंडळी उपस्थित होती. अशा या थोर समाजसेवक, लोककवी व लेखकास विनम्र अभिवादन.



धम्मदीप बुद्ध विहार शिवाजीनगर बीड येथे साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांची १०५ वी जयंती समाज प्रबोधन करून उत्साहात संपन्न झाली.



लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त मुप्टा शिक्षक संघटनेच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बीड जिल्हाध्यक्ष शरदराव मगर, जिल्हासचिव प्रा शशिकांत जावळे, माध्यमिक जिल्हाध्यक्ष प्रविण तरकसे, जिल्हासचिव शैलेश चिलवंत, प्रा.आन्वर पदाधिकारी उपस्थित होते.



साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त कालकथीत बन्सीलाल एकनाथराव सोनवणे युवा क्रीडा मंडळाच्या वतीने विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी बंटी जोगदंड, अजिंक्य सोनवणे, आशिष यादव, शुभम वडमारे, रोहित वडमारे, रोहित धवन, साहिल ओव्हाळ उपस्थित होते.



साहित्य सम्राट लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिवादन केले, मीराताई नवले सोबत रवी वाघमारे, नवनाथ प्रभाळे, राजाभाऊ हुरकुडे सह आदी.

### कुरैशी समाजाच्या व्यापारी यांच्यातर्फे जनावरांची खरेदी विक्री बंद केल्यामुळे पशुपालक संकटात

# गेवराई जमियात कुरेशीचा एल्गार

# ना कापणार ना कापू देणार

**गेवराई । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे कुरैशी समाज बिरादरी ने संपूर्ण राज्यात जनावरांची खरेदी विक्री बंद केल्यामुळे शेतकरी व पशुपालक संकटात आले आहेत. यासंदर्भात गेवराई जमियात कुरेशी यांनी तहसीलदारांना एक निवेदन देऊन यावर तोडगा काढण्याची मागणी केली आहे.




निवेदनात नमुद राज्यात गोवंश हत्या बंदी कायद्यामुळे जनावरांची वाहतूक करणाऱ्या व्यापारी यांना तथाकथित गौरक्षकांच्या व स्वघोषित सघटनेच्या पदाधिकारी यांच्या कळुन वाहने अडवली जात आहे व त्यांना दमदाटी करून पोलीसांची व कायद्याची भिती दाखवून पैसे उकळले जात आहे. जनावरे हिसकावून घेऊन त्यांचे संरक्षण करण्यासाठी संगोपना साठी गोशाला मध्ये पाठवून दिली जाते या भिती मुळे व्यापारी यांच्यात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे असुन यामुळे कुरैशी समाजाच्या व्यापारीयांनी या व्यवहारात सहभागी न होण्याचा एकमुखी निर्णय घेतला आहे.

यामुळे गेवराई तालुक्यातील जनावरांचे बाजार पेठ ठप्प झाल्या आहेत. शेतकऱ्यांची व पशुपालकांची अवस्था अशी झाली आहे माय जेऊ घालेना व बाप भिक मागू देईना अश्या संकटात शेतकरी व पशुपालक अडकला आहे. सद्यस्थितीत शेतकरी यांना शेती परवडत नसल्याने शेतकरी जोडधंदा म्हणून सरकारकडुन पशुपालनाचे पर्याय सुचवले जात आहे त्यासाठी अनुदान पण दिले जाते मात्र त्यांच सरकार ने राज्यात गोवंश बंदी कायदा लादल्याने शेतकरी व व्यापारी दोन्ही ही अडचणीत आले आहेत. गेवराई जमियात कुरेशी यांनी निवेदन म्हटले आहे. सरकारच्या वन्यजिव संरक्षण कायद्यामुळे शेतकरी यांच्या शेतातील पिकांचे वन्यजीव प्राणी पिकांची नासाडी करीत आहे. या दुहेरी संकटात शेतकरी अडकला आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने गोवंश हत्या बंदी कायद्या व वन्यजीव संरक्षण कायद्यात शिथिल करावा जनावरांच्या खरेदी विक्री यासाठी योग्य वातावरण निर्माण करावे शेतकरी व पशुपालक से गोवंश भाकड जनावरे कुरैशी समाजच्या व्यापारी यांना विक्री करतो. चागंली जनावरे शेतकरी व पशुपालक से कधिच विक्री करीत नाही तरी संबंधित अधिकारी यांनी या समस्याकडे गंभीर्याने लक्ष देण्याची आवश्कता आहे. आमच्या भावना शासना पर्यन्त पोहते करावे, असे निवेदनात गेवराई जमियात कुरेशी यांनी नमुद केले आहे.



## वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परची टेम्पोला जोरदार धडक

### आष्टी तालुक्यात राजरोसपणे वाळूची वाहतूक, महसूल विभाग मात्र गाढ झोपेत

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यात सध्या वाळूची वाहतूक राजरोस होताना सर्वत्र दिसून येत असताना सुद्धा महसूल विभाग याच्यावरती काहीच कारवाई करताना दिसून येत नाही. याचाच परिणाम म्हणून वाळूची चोरटी वाहतूक करणारे टिप्परचे टायर फुटल्याने विरोध दिशेला जाऊन एका टेम्पोवर धडकल्याची घटना शुक्रवार सकाळी ६:३० वा. दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील सांगवी शिवारात घडली. सुदैवाने या अपघात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, अहिल्यानगर येथून पीव्हीसी पाईप घेऊन एक टेम्पो (एम.एच.१६ ए.वाय.३२२३) सकाळी बीडकडे जात असताना याचवेळी डोईठाण वरून धामणगावकडे अवैध वाळू वाहतूक करणारे टिप्पर भरधाव वेगात जात होता. सकाळी ६:३० वा. दरम्यान बीड-अहिल्यानगर राज्य महामार्गावरील आष्टी तालुक्यातील सांगवी परिसरात टायर फुटल्याने टेम्पो अनियंत्रित होऊन विरुद्ध दिशेला जाऊन टेम्पोवर धडकला.

या अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने चालक किरकोळ जखमी झाले आहेत. माहिती मिळताच घटनास्थळी कडा पोलिस चौकीचे पोलिस हवालदार भाऊसाहेब आहेर, अमोल नवले, वाहन चालक प्रताप घोडके यांनी भेट दिली असून पंचनामा केला. अपघातग्रस्त वाहने मात्र बराच वेळ रस्त्यावर पडून होती.

### कुटुंब बैचेन; शोध कधी लागणार, तपास अधिकारी बदण्याची मागणी

# ४० दिवस उलटूनही अंभोरा पोलिसांना 'तिचा' शोध लागेना!

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

घरात झोपलेल्या अल्पवयीन मुलीला रात्रीच्या दरम्यान फुस लावून पळवून नेल्याची घटना घडून ४० दिवसाचा कालावधी उलटून गेला तरी देखील अंभोरा पोलिसांना पळवून नेलेल्या मुलीचा शोध लागत नसल्याने पोलिसांच्या तपासावर प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. साहेब माझ्या मुलीचा शोध लागेल का असा सवाल हताश झालेल्या बापाने उपस्थित केला आहे.

आष्टी तालुक्यातील एका गावातील १७ वर्षीय मुलगी १८ जुन रोजी नेहमी प्रमाणे तिच्या खोलीत झोपली होती. पण अचानक रात्रीच्या दरम्यान तिच्या खोलीचा दरवाजा उघडला दिसल्याने कुटुंबाने शोधाशोध केला. पण ती कुठेच मिळून आली नाही. दुसऱ्या दिवशी मुलीच्या वडिलांनी अंभोरा पोलिस ठाण्यात मुलीला कोणीतरी अज्ञात व्यक्तीने फुस लावून पळवून नेल्या प्रकरणी कलम १३७(२) नुसार गुन्हा दाखल केला आहे. कुटूंबाने नातेवाईक, पाहुणे, रावळे, सगळीकडे शोध घेतला पण ती कुठेच मिळून आली नाही. मुलगी कुठे असेल, कोणत्या अवस्थेत असेल, तिच्या जिवाचे काही बरे वाईट तर झाले नसेल ना, हे विचार सारखे डोक्यात घोळत असल्याने कुटुंब हताश झाले आहे. तपास अधिकार्यांकडून तपास सुरू असल्याचे आश्वासन दिले जात असले तरी ४० दिवस उलटून देखील त्या अल्पवयीन मुलीचा शोध लागला नाही. जर पोलिसांना याचा शोध लाखत नसले तर सदरील प्रकरण वरिष्ठांच्या आदेशानुसार दुसरा तपास अधिकारी देऊन वर्ग करावे. व आमच्या मुलीचा शोध लावावा अशी मागणी तिच्या कुटुंबियांनी केली आहे. चार, आठ दिवसांला पोलिस ठाण्यात हेलपाटे मारतोय, दोन वेळा पोलिस अधीक्षक कार्यालयात जाऊन आलोय, तपास सुरू असल्याचे सांगतात. एवढे दिवस झालेत तरी तपास नेमक कसा सुरू आहे. हेच कळत नाही. आता आम्ही वैतागून गेलो असून न्यायासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषणास बसणार असल्याचे पिडितेच्या वडिलांनी सांगितले.

## केज शहरातील बसस्थानकासमोर चार वाहनांचा साखळी अपघात

### जिवित हानी टळली; अतिक्रमणाच्या विळख्यामुळे अवजड वाहने वळण्यास होत आहे त्रास

**केज । प्रतिनिधी**

शहरातील बसस्थानकासमोर आज सकाळी चार वाहनांचा भीषण साखळी अपघात झाला. या अपघातामध्ये एसटी बस, ट्रक, जीप आणि स्विफ्ट कारचा समावेश असून वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही.



प्राथमिक माहितीनुसार, एसटी बस बसस्थानकाच्या बाहेर येत असताना समोरून भरधाव वेगात ट्रक आला. ट्रकने समोरील जीपला जोरदार धडक दिली. या धडकेनंतर ट्रक अचानक थांबला असतानाच त्याच्या मागून येणाऱ्या स्विफ्ट कारने थेट ट्रकला धडक दिली. अचानक झालेल्या या धडकांमुळे जीप आणि कारचे मोठे नुकसान झाले असून बसलाही धक्का बसला आहे. अपघातानंतर बसमधील सर्व प्रवाशांना सुखरूपपणे बाहेर काढण्यात आले असून त्यांना कोणतीही दुखापत झालेली नाही. कार आणि जीपमधील काही प्रवाशांना किरकोळ दुखापती झाल्या असून त्यांच्यावर केज उपजिल्हा रुग्णालयात प्राथमिक उपचार सुरू आहेत.

घटनास्थळी पोलीस दाखल झाले असून वाहतूक सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. गर्दी आणि वाहतूक नियोजनाचा अभाव हे अपघाताचे संभाव्य कारण असल्याचे सांगण्यात येत आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करत आहेत.



## पंतप्रधान आवास योजनेतील ६६ लाभार्थ्यांना आ. मुंदडांच्या हस्ते घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ६६ संकल्पनेतून सुरू झालेल्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत अंबाजोगाईतील लाभार्थ्यांना घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप आमदार नमिता मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. अंबाजोगाई नगर परिषदेच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमास लाभार्थ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या वेळी बोलताना आमदार नमिता मुंदडा म्हणाल्या की, सर्वांना राहण्यासाठी हक्काचे घर मिळावे यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून पंतप्रधान आवास योजनेची सुरुवात झाली.

सध्या या योजनेचा दुसरा टप्पा सुरु आहे. यापूर्वीच्या टप्प्यात अंबाजोगाई शहरातील ५११ लाभार्थ्यांना या योजनेतून तर १८३ लाभार्थ्यांना रमाई आवास योजनेतून घरकुलांचे वाटप झाले. या वर्षी ६६ लाभार्थ्यांना प्रातिनिधिक स्वरुपात घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप करताना मनस्वी आनंद होत आहे. सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे अंबाजोगाई नगर पालिका लोकांपर्यंत योजनेचे लाभ पोहोंचविण्यात यशस्वी ठरली.

**विकासनिधीची कमतरता पडणार नाही**

यापूर्वीच्या काळात लोकहिताच्या योजनांचे लाभनगर परिषदेमार्फत गरजूंपर्यंत व्यवस्थित पोहोंचत नव्हते. मात्र, आता माझे सर्व बाबींवर बारकाईने लक्ष आहे. मागील काही काळात अंबाजोगाई शहरासाठी मोठा निधी उपलब्ध करून दिला. त्यामुळे शहरात अतिशय वेगाने विकासात्मक बदल सुरु असून शहराचा चेहरामोहरा बदलतो आहे. लोकहिताच्या दृष्टीने नगर पालिकेला निधीची कमतरता पडू देणार नाही असा विश्वास आ. मुंदडा यांनी याप्रसंगी नागरिकांना दिला. योजनेपासून वंचित राहिलेल्यांनी लाभ घ्यावा. पंतप्रधान आवास योजना २०२९ पर्यंत सुरु राहणार आहे. अजूनही या योजनेच्या निकषात बसणाऱ्या कोणी व्यक्तींनी लाभघेतलेला नसेल तर त्यांनी त्वरित प्रयत्न करावेत असे आवाहन आ. मुंदडा यांनी केले.

या कार्यक्रमात ६६ लाभार्थ्यांना घरकुल प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजप केज विधानसभा अध्यक्ष शरद इंगळे, शहराध्यक्ष संजय गंभिरे, प्रशांत आदनाक, अनंत अरसुडे, शिरीष मुकडे, अजय राठोड, गोपाळ मस्के यांच्यासह नगर परिषद अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## दारूच्या नशेत वाहनांवर ताबा; अपघाताचे प्रमाण वाढले!

**दौलावडगाव । प्रतिनिधी**

गावोगाव दारूची विक्री होत असल्याने अनेक तरूण व्यसनाच्या आहारी गेले आहेत. एवढेच नव्हे सध्या दारूच्या नशेत दुचाकी असो कि चारचाकी या वाहनांवर ताबा घेऊन सुसाट चालवले जात असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले असून अनेकांना आयुष्य संपविण्याची वेळ आली आहे. तर अनेकांना कायमचे अपंगत्व आले आहे. हॉटेलवरील दारूविक्री बंद करून दारूच्या नशेत वाहन चालकांवर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमजद शेख यानी केली आहे.



**आष्टी तालुक्यातील हॉटेल, ढाब्यावरील विनापरवाना दारू विक्रीवर कारवाई कधी?**

आष्टी तालुक्यात गेल्या अनेक महिन्यांपासून हॉटेल, ढाब्यावर विनापरवानगी दारूची विक्री वाढली असून यामुळे तरूण पिढी व्यसनाच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. तर दारूच्या नशेत झिंग होऊन चारचाकी असो कि दुचाकी चालवण्याचा हट्ट करून सुसाट वेगात वाहन चालवले जाते. वेगावरील नियंत्रण सुटल्याने अपघाताच्या घटना वाढल्या असून अनेक तरूणाचे जीव गेले आहेत. तर अनेकांना कायमचे अपंगत्व घेऊन घरात बसावे लागले आहे. याकडे पोलिस प्रशासनाने याकडे लक्ष देऊन दारू विक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्यावर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते अमजद शेख यानी केली आहे.

## क्रूर सावकाराचा जामीन जिल्हा न्यायालयाने फेटाळला

### सावकार जाधवचा मुक्काम आता कोठडीतच; राम फाटले कुटुंबीयांना न्यायालयाने दिला मोठा दिलासा

**बीड । प्रतिनिधी**

पडित फटाले कुटुंबीयांना न्यायालयाचा दिलासा खाजगी सावकार डॉ. लक्ष्मण जाधव याचा जामीन आदरणीय जि. न्यायालयाकडुन फेटाळण्यात आला आहे. पेठ बीड भागातील बहुचर्चित राम फटाले आत्महत्या प्रकरणी तुरुंगात असलेले खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव यांचा आज जिल्हा व सत्र न्यायालय बीड यांनी तडकाफडकी जामीन अर्ज नामंजूर केल्यामुळे फटाले कुटुंबीयांना एक प्रकारे मोठा दिलासा मिळाला आहे.



या प्रकरणाबाबत थोडक्यात माहिती अशी की, पेठ बीड भागातील रहिवासी मयत राम फटाले हे खाजगी सावकारकीच्या फासात अडकले होते, खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव यांचे कडून त्यांनी कुटुंबीयांच्या गरजा भागविण्याकामी खाजगी कर्ज उचलले होते ज्याची परतफेड व व्याज अदा करूनही त्यांना खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव हे एनकेन प्रकारे त्रास देत होते, व आणखी पैशाची मागणीचा तगादा लावत होते, शेवटी राम फटाले यांचे कडे पैसे नसल्याने ते हवालदिल झाले यातच आरोपी लक्ष्मण जाधव यांनी राम याचेवर मानसिक दबाव आणून जर तुझ्याने व्याजाचे पैसे देणे होत नसेल तर तुझ्या पत्नीला माझ्याकडे आणून सोड अशा प्रकारचा गलिच्छ प्रकार केल्यामुळे मयत राम फटाले हे मानसिक दबावाखाली आले व यातच त्यांनी आपली जीवन यात्रा संपवली व गळफास घेतला यास कारणीभूत असलेले व सत्ताधारी पक्षाच्या संघटनेचे पदाधिकारी असलेले खाजगी सावकार डॉक्टर लक्ष्मण जाधव यांना अटक झाल्यानंतर त्यांची रवानगी जिल्हा कारागृह बीड येथे करण्यात आली, त्यानंतर त्यांनी जामीन मिळणे कामी मा. सत्र न्यायालय बीड येथे त्यांचा जामीन अर्ज मांडला होता या मध्ये फिर्यादी पक्ष व आरोपी पक्ष यांच्या वतीने जोरदार युक्तिवाद करण्यात आला सदर सुनावणीनंतर मा. न्यायालयाने खाजगी सावकार आरोपी लक्ष्मण जाधव याचा जामीन अर्ज तडकाफडकी फेटाळला त्यामुळे फटाले कुटुंबीयांना न्यायालयाने फार मोठा दिलासा दिल्याचे बोलले जात आहे.


या प्रकरणात फिर्यादी पक्षाच्या वतीने बीड शहर बचाव मंचचे मुख्य कायदेशीर सल्लागार ॲड. अनिल बारगजे यांनी कागदपत्रांसह जोरदार युक्तिवाद केला तसेच सरकार पक्षातर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी वकील सरवदे यांनी देखील भक्कम बाजू मांडली व या आधारे सर्व पडताळणी करून मा. न्यायालयाने आरोपी लक्ष्मण जाधव याचा अर्ज फेटाळला आहे त्यामुळे आरोपीच्या तुरुंगातून बाहेर पडण्याच्या स्वप्नावर विरजण पडले आहे. तसेच शहरात खाजगी सावकारकीचा व्यवसाय करणाऱ्याचे धाबे दणाणले आहेत. बीड शहर बचाव मंचाचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डीजे तांदळे, अध्यक्ष नितीन जायभाये, ॲड. नितीन वाघमारे आदि सर्व पदाधिकाऱ्यांनी ॲड.अनिल बारगजे यांचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन केले आहे.

### जरांगे पाटलाचा अवतार घेऊन आलास का देवा
### मराठ्यांनी २९ ऑगस्टला मुंबईला यावा : किरण डावकर

## प्रत्येक गावामध्ये मुंबईला चला असे बॅनर लावा

**बीड । प्रतिनिधी**

चंद्र सूर्य जोपर्यंत पृथ्वीतलावर आहेत तोपर्यंत आपल्या लेकराला हक्काची रोटी मिळवायची असेल तर येणाऱ्या २९ ऑगस्टला जास्तीत जास्त संख्येने मुंबई कडे मार्गस्थ होण्यासाठी तयारीला लागा. पिढ्यान पिढ्या नेत्यांच्या सतरंज्या उचलण्यासाठी रात्रंदिवस एक करणाऱ्या लोकांनी आपल्या मुलांच्या व आपल्या येणाऱ्या पिढीच्या भविष्यासाठी एक दिवस मुंबईला येण्यासाठी आपल्या सर्वांना ताकदिने सामील व्हायचं आहे.



आपण आपल्या मित्रांना आणि आपल्या नातेवाईकांना निमंत्रण द्यायच आहे. मनोज दादा जरांगे पाटलांची तब्येत ठीक नसतानाही आपल्या सर्वांच्या भवितव्यासाठी आपल्या मराठा समाजासाठी स्वतःच्या घरावर तुळशीपत्र ठेवून हा योद्धा आपल्यासाठी झुंज देत आहे. त्यामुळे आपल्या सर्वांची उपस्थिती मनोज दादांनी केलेल्या संघर्षाची नोंद इतिहासात लिहिण्यात येईल आणि आपल्या सर्वांना हक्काच आरक्षण मिळून आपल्या सर्वांचे स्वप्न मनोज दादाच्या प्रयत्नाने पूर्ण होईल याचसाठी आपल्या सर्वांना येत्या २९ ऑगस्टला आपले सर्व कामधंदे, नोकरी, जॉब सर्व कामे जे काय असेल ते पाठीमागे सोडून आपल्या संघर्ष योद्धा मनोज दादाच्या पाठीमागे खंबीरपणे उभारण्याची गरज आहे संसार तर सर्वांनाच आहे परंतु आपल्या सर्वांच्या भवितव्यासाठी स्वतःच्या संसाराची राख रांगोळी करून आपल्यासाठी मनोज दादा जरांगे पाटील आपल्याला आव्हान करत आहेत तर आपली ही जबाबदारी आहे सात करोड मराठ्यांनी एकदिवस येत्या २९ ऑगस्टला मुंबईच्या दिशेने रवाना व्हायच आहे.

मनोज दादाच्या माध्यमातून ८० टक्के मराठा समाज हा कुणबी म्हणून ओबीसी मध्ये सामील झाला आहे आणि राहिलेला वीस टक्के समाज देखील कुणबी म्हणून ओबीसी मध्ये सामील झाल्याशिवाय राहणार नाही त्यामुळे आपण तर यायचंच आहे परंतु आपल्याबरोबर आपले मित्र, आपले नातेवाईक आणि आपल्या गावामध्ये अनेक वंचित बांधवांना देखील येण्यासाठी आव्हान करायच आहे कारण मनोज पाटील हे सर्वांच्या हक्कासाठी लढा देत आहेत त्यामुळे सर्व जातीधर्माच्या लोकांनी यामध्ये सामील होऊन ऐतिहासिक दिवसाचे साक्षीदार होणे गरजेचे आहे असे आवाहन मराठा बांधव किरण डावकर यांनी सर्व महाराष्ट्रातील मराठा बांधवांना केले आहे.

### कडुबाई खरातांच्या गाण्यांतून अण्णाभाऊंच्या गौरवाचा गोडवा

## प्रचंड जल्लोषात गेवराईच्या तरुणाईने धरला ठेका

**गेवराई । प्रतिनिधी**

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या संगीत- सांस्कृतिक कार्यक्रमात प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील गाण्यांवर तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला. अहो, गणित बघा विचारून त्या वादळ वाऱ्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त..! या आणि अशा विविध प्रबोधनात्मक गाण्यांची बरसात करून कडुबाई खरात यांनी धमाल उडवून दिली. कडुबाई खरातांच्या गाण्यातून अण्णाभाऊंच्या गौरवाने शहरातील तरुणाईने प्रचंड जल्लोषात ताला-सुरातठेका धरल्याने कार्यक्रमात रंगत आली.



लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवार दि ३० रोजी सायंकाळी ८ वाजता साठेनगर येथे प्रसिद्ध गायिका कडुबाई खरात यांच्या गोड आवाजातील संगीत-सांस्कृतिक ऑर्केस्ट्रा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला वंदन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गणित बघा विचारून त्या वादळ वाऱ्याला, अण्णाभाऊंच नाव दिलं आकाशातील ताऱ्याला, घ्या सजवून समाज मस्त, अन दाखवा पावर जबरदस्त, भीम माझं ग, दिल्लीत भाषण देई, तुम्ही खातात त्या भारीवर बाबासाहेबांची सही हायरं, माजी मैना गावावर राहीली, राजा राणीच्या जोडीला सात मजली माडिला, सांगा कुणाचं योगदान लाल दिव्याच्या गाडीला..! गायिका कडुबाई खरात यांनी एकापेक्षा एक सरस गाणी सादर करून, कार्यक्रमात रंगत आणली. या गाण्यांवर तरुणाईने ताला-सुरात ठेका धरला.

साहित्यरत्न लोकशाहीर डॉ आण्णाभाऊ साठे सार्वजनिक १०५ व्या जयंतीनिमित्त शतनाम गायिका कडूबाई खरात यांची संगीत मैफिल गेवराईत रंगली. साहित्यरत्न लोकशाहीर डॉक्टर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त महाराष्ट्र राज्यातील ख्यातनाम भारुड तसेच लोक प्रबोधन पर गीतकार श्रीमती कडूबाई खरात यांचा लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जीवनावर आधारित व साहित्य व आधारित लोकप्रबोधन पर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक प्रवीण कुमार बांगर, संजय गांधी निराधार योजनेचे अध्यक्ष दादासाहेब घोडके, युवानेते रोहित पंडित, सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार, उद्धव मडके, उपाध्यक्ष प्रभाकर पिसाळ, उपाध्यक्ष अरुण मस्के, सचिव शरद मोटे, पप्पू गायकवाड, संघटक शेख अमजद बब्बु, सय्यद एजाज, किशोर वादे, कोषाध्यक्ष उद्धव मडके, रवि पवार, सहसचिव अण्णासाहेब राठोड, कोषाध्यक्ष उद्धव बापु मडके, सहकोषाध्यक्ष आबा ढाकणे, रविंद्र पवार, मार्गदर्शक रविंद्र बोराडे, कार्याध्यक्ष रंजित घुंबार्डे, सहकार्याध्यक्ष शिनु भाऊ बैदरे संघटक सय्यद एजाज, किशोर वादे, सहसंघटक शेख अमजद बब्बु, डिजीटल प्रसिद्ध प्रमुख रविंद्र पवार, सदस्य प्रभाकर भालशंकर, गुफरान इनामदार, अमोल दावडकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. समाजबांधवानी कार्यक्रमासाठी यशस्वी प्रयत्न केले.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT